
एका वेगळ्या लग्नाची गोष्ट

उमा कुलकर्णी



भारत ज्ञान विज्ञान समुदाय

पुस्तकाचे नाव : एका वेगळ्या लग्नाची गोष्ट
लेखक : उमा कुलकर्णी
चित्रकार : खलील खान
निर्मिती सहाय्य : दिनानाथ मनोहर
संपादन : विनया देशपांडे

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समितीतर्फे
राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर
चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन'
मोहिमेसाठी प्रकाशित

जवाआं/३५

प्रकाशन : सप्टेंबर १९९९

अक्षर जुळणी : गणेश कांबळे

मूल्य : ३ रूपये

प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
अक्षय,२१६,केळकर रस्ता,नारायण पेठ,पुणे-४११०३०.
फोन : ०२०-४४५६६९४
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे-४११००४.

एका वेगळ्या लग्नाची गोष्ट

उमा कुलकर्णी



भारत ज्ञान विज्ञान समुदाय

पुस्तकाचे नाव : एका वेगळ्या लग्नाची गोष्ट
लेखक : उमा कुलकर्णी
चित्रकार : खलील खान
निर्मिती सहाय्य : दिनानाथ मनोहर
संपादन : विनया देशपांडे

जवाआं/३५

प्रकाशन : सप्टेंबर १९९९

अक्षर जुळणी : गणेश कांबळे

मूल्य : ३ रूपये

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समितीतर्फे
राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर
चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन'
मोहिमेसाठी प्रकाशित

प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ, पुणे-४११०३०.
फोन : ०२०-४४५६६९४
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे-४११००४.

एका वेगळ्या लग्नाची गोष्ट

यलबुर्गा तालुक्यातल्या बस्सापूर गावातली ही गोष्ट. गाव तसं चांगलं. पीक-पाणी भरपूर. खायला-प्यायला कमी नाही. गावातली माणसं आनंदी. त्यांना गाण्याची खूप आवड. सण, लगीन, बारसं काहीही असलं तरी गाणी व्हायचीच. गावात मेळे आले, नाटक करणारी माणसं आली की त्यांना वाटायचं, मोठा सणच आला! गावातली मुलं, बायका, पुरूष, म्हातारे सगळे पारापाशी जमायचे. गाणी अैकायचे. नाटक बघायचे. त्यांच्या दिवसभर थकलेल्या शरीराला आणि मनाला विसावा मिळायचा.

लग्नाचे दिवस आले की गावात लगीन घाई उडून जायची. मूल पाळण्याबाहेर येऊन चालायला लागलं की झालं! त्याच्या आई-वडिलांना, वाटायचं कधी याचं लगीन होईल आणि आपण मोकळे होऊ! काही मुलांची तर पाळण्यालाच बाशिंग बांधून लग्नं लावून द्यायचे. काही कळायच्या आधीच मुलं-मुली, नवरा-बायको व्हायचे. मुलीला न्हाण आलं की ती नवऱ्याच्या घरी नांदायला जायची.

अक्कव्वा या गावातली अशीच अेक मुलगी. आई-वडिलांची लाडकी लेक आणि भावाची



लाडकी बहीण. शेजारच्या आया-बायांना वाटायचं, हिच्या सोन्यासारख्या गुणांचं कौतुक करू की रूप्या सारख्या रूपाचं? आवाज तर इतका गोड! गावातल्या कुठल्याही लग्नात लहानग्या अक्कव्वाची दोन-चार गाणी व्हायचीच. त्याशिवाय मुलगी सासरी जायची नाही की मुलगा नवरी आणायचा नाही!

होता-होता अक्कवा आठ वर्षांची झाली. सातवं सरून आठवं वर्ष सुरू झालं. तशी अक्कव्वाच्या आई-वडिलांना काळजी वाटू लागली. आता अक्कव्वाचं लगीन करायला पाहिजे. चांगलं घरदार शोधायला पाहिजे. लाडक्या लेकीसाठी जावई शोधायला पाहिजे. वडिलांच्या मागं आईची भुण-भुण सुरू झाली. वडीलही जोडे झिजवू लागले. चांगला मुलगा शोधू लागले.

अक्कव्वाच्या मैत्रिणींची लग्नं ठरत होती, होत होती. सहा वर्षाच्या चंदव्वाचं लगीन झालं. सात वर्षाच्या सुब्बक्काचंही ठरलं. अक्कव्वाच्या आईचा जीव थोडा-थोडा होऊ लागला. गावात नऊ-दहा वर्षाच्या घोड-नवऱ्याही विना लग्नाच्या बसल्या होत्या. त्यातली नंदक्का तर शाळेलाही जात होती. गावातले सगळे तिला चिडवायचे. आपल्या अक्कव्वाला कुणी नावं ठेवू नये असं आईला वाटायचं. म्हणून आपल्या मुलीच्या लग्नाची तिला घाई झाली होती.

अेक दिवस अक्कव्वाचे वडील आनंदानं घरी आले. घरात पाऊल ठेवल. आणि त्यांनी शेजारच्या गावातल्या अेका मुलाचं गुणगान करायला सुरूवात केली. मुलगा बारा वर्षाचा अक्कव्वाला साजेल असा होता. दिसायला देखणा. आई-वडील चांगले होते. कष्टाळू माणसं आणि स्वतःची शेती. भरपूर राबावं आणि धन मिळवावं. पाहुण्यांना अक्कव्वा आवडली. अक्कव्वाच्या आईला जावई पसंत पडला.

अक्कव्वाच्या घरी आनंदी-आनंद झाला. लग्नाचा दिवस ठरला. देणं-घेणं आणि मान-पान ठरले. घरात पाहुणे जमले. काका-काकू, मामा-मामी, आत्या-मावशी, त्यांची मुलं-बाळं सगळे आले. गोड-धोड केलं. अक्कव्वासाठी हौसेनं दागिने केले. अक्कव्वा छान छान लुगडी नेसली. हातात कोपऱ्यापर्यंत काचेच्या बांगड्या घातल्या. पायात तोरड्या आणि साखळ्या आल्या. केसांमध्ये तिची आवडती मोगऱ्याची फुलं गजरा करून इतकी माळली होती! त्यांचा वास घेता घेता तिचं नाक दुखायला लागलं. अक्कव्वाला इतका आनंद झाला होता, कधी अेकदा मैत्रिणींना सगळं दाखवेन

असं तिला झालं होतं. पण आई तिला दामटून अेका जागी बसवून ठेवत होती.आणखी अेक म्हणजे



तिला कुणी गाणी म्हणायला देत नव्हतं. तिनं आईला विचारलं तेव्हा आई म्हणाली, 'अगं, आपल्या

लग्नात आपणच गाणी म्हणायची नसतात!'

लगीन पार पडलं. अक्कव्वाच्या आईनं पाहुण्यांना स्पष्टच सांगितलं, 'माझ्या लेकीला न्हाण आल्यावरच सासरी धाडून देईन.'

अक्कव्वा आईकडेच राहू लागली. तिचं गाणी म्हणनं, फुलांचे गजरे करून माळणं नेहमीसारखंहोतं. पण तिची आई तिला आता मैत्रिणींबरोबर खेळू देत नव्हती. उलट घरातली कामं करायला सांगत होती. स्वयंपाक करायला शिकवत होती. अक्कव्वालाही घरातली कामं करायला आणि स्वयंपाकघरात चांगलं-चुंगलं शिजवायला आवडत होतं.

अक्कव्वा बारा वर्षांची झाली. अेक दिवस बातमी आली. बातमी कसली? अक्कव्वावर आकाश कोसळलं होतं. तिचा सोळा वर्षांचा नवरा आठ-दहा दिवस आजारी पडून मरून गेला होता.

बघता-बघता गावभर बातमी पसरली. सगळ्या आया-बाया जमल्या. अक्कव्वाच्या ओसरीवर हलकल्लोळ उडाला. अक्कव्वाच्या आईचं रडणं अैकून पोटात पिळ पडत होता.

अक्कव्वाला मात्र यातलं काहीही कळत नव्हतं. बायांनी तिच्या हातातल्या बांगड्या काढल्या,



गळ्यातली पोत काढली, केसांतला गजरा काढू लागल्या तेव्हा मात्र अक्कव्वाला रडू आलं.

असेच दिवस चालले होते. आता अक्कव्वा केसांत तिचा आवडता मोगऱ्याचा गजरा माळत नव्हती. हातांत वेगवेगळ्या रंगाच्या चमचमणाऱ्या बांगड्या भरत नव्हती. कपाळावर तिचं आवडतं लाल चुटूक कुंकू लावत नव्हती. अंगावर नवी लुगडी नेसत नव्हती. कितीही वाटलं तरी आरशात बघायची सोय नव्हती. चुकून डोकावलं तर आईच रागावायची. थोडं नीट राहिलं तर शेजारच्या आया-बाया नावं ठेवायच्या.

गावातल्या चंदम्मा आणि सुब्बक्काही नवरे वारल्यामुळे माहेरीच राहिल्या होत्या. नंदक्काची शाळा मात्र सुरू होती. तिचे आई-वडील आता दुसऱ्या गावी राहायला गेले. नंदक्काही त्यांच्याबरोबर गेली. चंदम्मा आणि सुब्बक्काही अक्कव्वासारख्याच न हसता, न खेळता, न गाता राहात होत्या.

निसर्गाच्या रीतीप्रमाणे अक्कव्वा वयात आली. तिला न्हाण आलं म्हणून कुणी तिला कौतुकानं गजरे आणले नाहीत. नवी लुगडी आणली नाहीत. गोड-धोड केलं नाही. विधवा मुलीला न्हाण आलं म्हणून अक्कव्वाची आई खूप-खूप रडली.

आईचं रडू बघून अक्कव्वालाही रडू आलं.



नंतर अक्कव्वाचं रडू ओसरलं. आता तिचं गाणं थांबलं होतं. हसणं-खिदळणं तर खूप लांब गेलं होतं. रोजची घरातली काम करून ती वेळ काढत होती. पण त्यात उत्साह नव्हता.

गावातल्या चंदम्मा आणि सुब्बक्काचीही हीच गत होती. तिघी अेकमेकींना भेटल्या तरी काय बोलायचं ते त्यांना कळत नव्हतं.

अशीच आणखी वर्ष गेली. अक्कव्वाचा पंधरा-सोळा वर्षांचा भाऊ

आता लग्नाचा झाला. त्याचं लग्न झालं आणि रंगम्मा अक्कव्वाची भावजय म्हणून घरी आली. न्हाण आल्यानंतरच तिचं लगीन झाल्यामुळे ती वऱ्हाडाबरोबरच वाजत-गाजत सासरी आली.

रंगव्वा घरी आली आणि अक्कव्वाला अेक छोटी मैत्रिण मिळाली. नव्या नवरीचे सगळे सण उत्साहानं साजरे होत होते. रंगव्वा नवी नवी रंगीत लुगडी नेसून मिरवत होती. अक्कव्वा दररोज सकाळ-संध्याकाळी तिच्या गजऱ्यासाठी फुलं गोळा करून आणत होती. त्यांचे लांब-लांब गजरे करून रंगव्वाला देत होती. प्रत्येक सणाला रंगव्वानं कोपऱ्यापर्यंत रंगीत बांगड्या भरल्या की अक्कव्वा कौतूकानं त्यांच्या वरून हात फिरवत होती.



रंगव्वालाही गाण्याची भारी आवड. अक्कव्वाला खूप गाणी येतात म्हणून समजल्यावर ती गाणी शिकून घेण्यासाठी रंगव्वा धडपडू लागली. रंगव्वाला गाणी शिकवण्यासाठी अक्कव्वा आपल्याला येत असलेली गाणी म्हणू लागली. दोघीही गाणी म्हणता-म्हणता रंगून जाऊ लागल्या. ते बघून अक्कव्वाच्या आईलाही थोडं बरं वाटू लागलं.

रंगव्वाला गाण्याबरोबरच नाटकाचीही फार आवड होती. गावात नाटक आलं की ती अक्कव्वाच्या मागे लागायची. अक्कव्वा नको म्हणत असतानाही सासू-सासऱ्यांची परवानगी घेऊन अक्कव्वाला बळेच ओढून नाटक बघायला घेऊन जायची.

नाटक बघताना दोघीही स्वतःला विसरून जायच्या. घरी आल्यावरही दोघी त्या नाटकातलंच बोलत राहायच्या. हळुहळु तो विषय मागं पडायचा. पण अक्कव्वा मात्र कितीतरी दिवस तोच विचार करत राहायची. आता तिचे दिवस पूर्वी इतके खूप-खूप कंटाळवाणे जात नव्हते.

अेक दिवस बातमी आली. सुबक्का परगावच्या अेका माणसाबरोबर पळून गेली होती. त्या माणसानं तिला मोठ्या गावात नेऊन दुसऱ्या बाईला धंद्यासाठी विकलं होतं. अेक दिवस चंदम्माही जळून वारल्याचं समजलं. दिवस राहिल्यामुळे तिनं स्वतःला जाळून घेतलं अशीही नंतर बातमी आली.

दोन बाल-मैत्रिणींच्या कथा अैकून अक्कव्वाला फार वाईट वाटलं. ती कुणाशी बोलेना. रंगम्मा गाणी म्हणायला लागली तरी तिला साथ देईना. अक्कव्वाला पहिल्यासारखी करायला काय करावं हे रंगम्मालाही समजेना.

खूप दिवसांनी गावात नाटक आलं तेव्हा रंगम्माला फार आनंद झाला. नाटक म्हटल्यावर

अक्कव्वा हसेल-बोलेल अशी तिला आशा वाटली. तिनं अक्कव्वाला बळेच नाटक बघायला तयार केलं.

या वेळी आलेलं नाटक आणि नाटक-कंपनी नेहमी सारखी नव्हती. 'महिला समस्या' या संस्थेनं ते नाटक बसवलं होतं. 'महिला समस्या' ही बायकांच्या सुख-दुखां:कडे बघणारी संस्था होती. त्यातील बायका-पुरूषांनी बसवलेलं हे नाटक नेहमीच्या नाटकांसारखं पारावर होत नव्हतं. रस्त्यावर, बाजारात, जत्रेत कुठंही माणसं जमली की यांचं नाटक सुरू होत होतं.

नको-नको म्हणत अक्कव्वा नाटक बघायला आली. रंगम्मा आणि अक्कव्वा गावकऱ्यांच्या गर्दीबरोबर नाटक बघायला उभ्या राहिल्या. अक्कव्वानं पाहिलं, तिची शाळा शिकणारी मैत्रिण नंदक्काही नाटक करणाऱ्यांमध्ये होती. आता तिचं लग्न झालं होतं. तिचा नवराही त्यांच्याबरोबर होता. नंदक्का नाटकात काम करताना तोच त्यांच्या दोन वर्षाच्या छोट्या मुलीला सांभाळत होता.

नाटक सुरू झालं. मध्ये-मध्ये गाणी म्हणत. नाटक अक्कव्वा सारख्या अेका मुलीचं होतं. मुलगी अगदी लहान असते. तिला काही कळत नसतानाच तिचं लग्न लावलं जातं. मुलगाही लहानच असतो. लग्नानंतर मुलगी माहेरीच राहात असते. पोरवयाचा मुलगा खेळताना झाडावरून पडून मरून जातो. या मुलीवर सगळं आयुष्य रडत काढायची वेळ येते.



नाटक बघताना अक्कव्वाच्या डोळ्यांना धारा लागल्या होत्या. नाटकातली मुलगी वयात येते. पण हसत नाही, बोलत नाही, गात नाही. तिच्या वयाच्या बाकीच्या मुली आनंदात असताना ही मात्र कोमेजून जाते. तिची मैत्रिण गाणं म्हणते -

तुपात माशी पडली म्हणून
तूप कुणी टाकून देतं का गं?
पायाला चिखल लागला म्हणून
पाय कुणी कापून टाकतं का गं?
हातातल्या बांगड्या पिचल्या
पुन्हा भरल्या म्हणून काय झालं गं?
गळ्यातली पोत ओघळली
पुन्हा ओवली म्हणून काय झालं गं?
रिकाम्या वेणीवर फुलं माळली,
पुन्हा दरवळली म्हणून काय झालं गं?

गाणं अैकून अक्कव्वाला राहावलं नाही. तिनं धावत जाऊन गाणाऱ्या नंदक्काच्या तोंडावर हात ठेवला. पाठोपाठ रंगम्मा धावली. अक्कव्वाचा हात धरून तिला ओढून घेऊन आली.

त्या दिवशी घरी आल्यावरही अक्कव्वा रड-रड रडली. आठव्या वर्षी झालेलं लग्न तिला थोडं-थोडं आठवत होतं. नवरा तर अजिबात आठवत नव्हता.

त्यानंतर तिनं कधी नवे कपडे घातले नव्हते. गोड-धोड खाल्लं नव्हतं. केसात कधी आवडता मोगऱ्याचा गजरा घातला नव्हता. कपाळावर आवडत कुंकू लावलं नव्हतं.

'महिला समस्या' संस्थेचे बायका-पुरूष गावात वेगवेगळ्या ठिकाणी नाटक करायचे. रंगम्मा अक्कव्वाला घेऊन प्रत्येक ठिकाणी जायची.

आता नाटकातलं ते गाणं अैकताना अक्कव्वा रडायची नाही. तिलाही वाटायचं मला अेवढी फुलं आवडतात, मी का माळायची नाहीत? जन्मल्यापासून मी कुंकू लावायची, बांगड्या घालायची, मग आता घातलं म्हणून काय बिघडलं? फार तर नवऱ्यानं बांधलेली पोत तेवढी बांधणार नाही.

अेक दिवस सकाळी अक्कव्वा उठली. घरकाम करताना तिला फार बरं वाटत होतं. तिनं अंघोळ केली. केसांची छान वेणी घातली. बागेत गेली. खूप फुलं गोळा करून घेऊन आली. दोन गजरे केले. अेक रंगम्माच्या वेणीत माळला, दुसरा आपल्या वेणीत. सगळीकडे सुवास पसरला. रंगम्मा मोठे आपल्या हातातल्या चार-चार बांगड्या काढून अक्कव्वाच्या हातात भरल्या. कपाळावर छान कुंकू लावलं. दोघींना खूप हसू येऊ लागलं. दोघी झोक्यावर बसल्या. गाणी म्हणू लागल्या.

गाणी म्हणता-म्हणता, झोके घेता-घेता दोघीही दमल्या. तरीही हसत राहिल्या.

शेजारीणीनं बघितलं. तिला वाटलं, अक्कव्वाचं डोकं फिरलं. तिनं तिच्या शेजारीणीला सांगितलं. दोघींनी विचार केला.'त्यांना कळेना हे वेड म्हणायचं? भुतानं झपाटलं म्हणायचं? दोघींनी ही बातमी गावभर केली. अक्कव्वाची आईही घाबरी झाली.

अक्कव्वाला आता नाटकाची गोडी लागली होती. वरचेवर भेटून आता तिची नंदक्काशीही नव्यानं ओळख झाली होती. जवळपासच्या गावात नाटक असलं की नंदक्का अक्कव्वाला आपल्याबरोबर नाटकातली गाणी म्हणायला बोलावू लागली. आईनं जाऊ नको म्हटलं तरी अक्कव्वा गाणी म्हणायला जात होती.

आपल्यासारख्याच मुलीची गोष्ट गाण्यातून सांगताना अक्कव्वा मनापासून गात होती. ती गाणी म्हणताना तिला खूप बरं वाटत होतं. 'महिला समस्या' संस्थेतल्या लोकांबरोबर फिरताना तिला इतरांची सुखं-दुखंही कळू लागली.

गावातल्या लोकांना मात्र अक्कव्वाचं वागणं मुळीच पटलं नाही. गावकरी तिच्या विरूद्ध काहीही बोलू लागले. तिला नावं ठेवू लागले. पण अक्कव्वानं तिकडं लक्ष दिलं नाही. तिची आई तिच्यावर रागावत होती. अक्कव्वाला वाईट वाटत होतं. पण तिनं तिकडे लक्ष दिलं नाही. आपलं



आपणच जगायचं असतं हे तिला समजलं होतं.

आता अक्कव्वा घरात हिरमुसली होऊन रडत बसत नाही. ती आनंदानं घरातली काम करते. तिच्या आईचा आता तिच्यावर पहिल्यासारखा राग राहिलेला नाही. आता रंगम्मा लेकुरवाळी झाली आहे. तिच्या दोन्ही लेकरांचा अक्कू आत्त्यावर फार जीव आहे. अक्कव्वाची गाणी आता सगळीकडे प्रसिद्ध झाली आहेत. आजूबाजूच्या गावात सण, लगीन, बारसं काहीही असलं तरी अक्कव्वालाच गाणी म्हणायला बोलवतात. शेजारच्या आया-बाया आपसात तिला नावं ठेवतात, पण कुणी त्यांचं अैकत नाही.

'महिला समस्या' ची नाटकं असली तर अक्कव्वाला बोलावणं येतं. असं बोलावणं आलं की अक्कव्वा केसांत गजरा घालते, हातात बांगड्या घालते, कपाळावर कुंकू लावते आणि छान लुगडं नेसून जाते. भरपूर गाणी म्हणते आणि आनंदानं घरी येते.

आणकीही अेक गंमत आहे, बर का! परवाच रंगम्माचा आत्तेभाऊ आला होता. चांगली नोकरी आहे. स्वतःच घर आहे, शिकलाय थोडाफार. अक्कव्वा त्याच्या नजरेत भरलीय. तो रंगम्माच्या मागं लागलाय. तुझ्या नणदेचा हात माझ्या हातात दे म्हणून! बघू या आता अक्कव्वा काय म्हणते ते!

जन वाचन आंदोलन



भारत ज्ञान विज्ञान समुदाय

मूल्य तीन रूपये

ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती
या ग्रंथाच्या तेजामधुनी जन्मा येते क्रांती
ग्रंथ शिकवती माणुसकी अन् ग्रंथ शिकवती शांती
निराश जीवा धीर देउनी पुढे घेऊनी जाती
ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती

पुस्तकातल्या सुंदर गोष्टी, सुंदर सुंदर गाणी
पुस्तकातुनी बालकवींची भेटतसे फुलराणी
तारे, वारे, झरे, पाखरे यांचे हे सांगाती
ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती

वाचन आहे प्रवास सुंदर, नव्या नव्या ज्ञानाचा
इतिहासाचा, साहित्याचा आणिक विज्ञानाचा
नव्या जगाचे नव्या युगाचे प्रकाश गाणे गाती
ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती

मंगेश पाडगावकर

जन वाचन आंदोलन



भारत ज्ञान विज्ञान समुदाय

मूल्य तीन रूपये

ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती
या ग्रंथाच्या तेजामधुनी जन्मा येते क्रांती
ग्रंथ शिकवती माणुसकी अन् ग्रंथ शिकवती शांती
निराश जीवा धीर देउनी पुढे घेऊनी जाती
ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती

पुस्तकातल्या सुंदर गोष्टी, सुंदर सुंदर गाणी
पुस्तकातुनी बालकवींची भेटतसे फुलराणी
तारे, वारे, झरे, पाखरे यांचे हे सांगाती
ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती

वाचन आहे प्रवास सुंदर, नव्या नव्या ज्ञानाचा
इतिहासाचा, साहित्याचा आणिक विज्ञानाचा
नव्या जगाचे नव्या युगाचे प्रकाश गाणे गाती
ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती

मंगेश पाडगावकर